गोपनीय

क्रमांक : का.स./बैठक/२६४

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १८ सप्टेंबर, २०१९

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०९ सप्टेंबर, २०१९ रोजी झालेल्या २६४व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सचिव,
कार्यकारी समिती

प्रति :

मुख्य सचिव, - अध्यक्ष
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

श्री. जयंत कुमार बांठिया - सदस्य
१००३/१००४, १० वा मजला,
बिल्डींग नं.३-ए, ग्रीन एकर्स,
लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी (प),
मुंबई – ४०० ०५३

श्री. ना. वि. मेराणी - सदस्य
ए/४७, आदर्श नगर,
वरळी, मुंबई - ४०० ०२५.

डॉ. शिरीष संख्ये - सदस्य
संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,
एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,
नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.

अपर मुख्य सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

..२

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण

अपर मुख्य सचिव (१), - सदस्य
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

****

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २६४व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **०९ सप्टेंबर, २०१९ (सोमवार)** |
| **वेळ** | **:** | **दुपारी ३.०० वाजता** |
| **स्थळ** | **:** | **मा. मुख्य सचिव यांचे समिती कक्ष<br>सहावा मजला, मंत्रालय,<br>मुंबई — ४०० ०३२.** |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. अजोय मेहता<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. संजय कुमार<br>अपर मुख्य सचिव,<br>गृहनिर्माण विभाग | - | सदस्य |
| श्री. आर.ए.राजीव<br>महानगर आयुक्त<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | - | सदस्य |
| डॉ. नितीन करीर<br>अपर मुख्य सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री.मनोज सौनिक
प्रधान सचिव,
वित्त विभाग

श्री.संजय खंदारे
अतिरिक्त महानगर आयुक्त (२),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

डॉ. बी.जी.पवार
सह-महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मूर्ती
संचालक (प्रकल्प),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. प्रमोद आहुजा
संचालक (कामे),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. पी.एम.किडे
प्रमुख अभियांत्रिकी,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. माधव नागरगोजे
वित्तीय सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती सु.भू.पेदे
सचिव, कार्यकारी समिती
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०५ सप्टेंबर, २०१९ रोजी झालेल्या २६३व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०५ सप्टेंबर, २०१९ रोजी झालेल्या २६३व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>बाब क्र. ३:</u>** **<u>मेट्रो मार्ग-४अ या मेट्रो मार्गाचा उन्नत मार्ग व दोन स्थानकांच्या स्थापत्य बांधकामाकरीता पॅकेज क्र.CA_५४ अंतर्गत मागविलेल्या ई-निविदांना मंजूरी देणेबाबत.</u>**

३.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना नमुद केले की, मुंबई मेट्रो बृहत आराखड्यामधील ३३७.१ कि.मी. मेट्रो मार्गांच्या जलद अंमलबजावणी करीता प्राधिकरणाने दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या १३८ व्या बैठकीत व राज्य शासनाने ऑक्टोबर, २०१५च्या बैठकीत मान्यता दिली आहे. सदर बृहत आराखड्यामधील मेट्रो मार्ग ४अ कासारवडवली-गायमुख चा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता मेट्रो कामांचा प्रदिर्घ अनुभव असलेल्या मे. डी. एम.आर. सी. या नामांकीत संस्थेने ऑक्टोबर २०१७ मध्ये प्राधिकरणास सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केला आहे. सदर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार प्रकल्पाचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता रु. ९४९ कोटी किंमतीच्या या प्रकल्पास राज्य शासनाने शासन निर्णय क्र. एमआरडी -३३१८/प्र.क्र.५७/नवि-७, दि. २५-०१-२०१९ अन्वये मान्यता दिली आहे. तसेच प्रकल्पासाठी अंमलबजावणी संस्था म्हणून प्राधिकरणास मान्यता दिली आहे._सद्य:स्थितीत मेट्रो मार्ग ४ करीता साधारण सल्लागार म्हणुन नियुक्त असलेल्या Consortium of M/s. DB Engineering & Consulting GmbH, Hill International Inc. and Louis Berger Consulting Pvt. Ltd. यांना या मेट्रो मार्ग ४-अ प्रकल्पासाठी साधारण सल्लागार म्हणून काम सोपविण्यात आले आहे.

३.२ संचालक (कामे) मेट्रो यांनी असे नमूद केले की, सदर प्रकल्पासाठी बोलविण्यात आलेल्या ई-निविदांच्या अनुषंगाने एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या व या निविदांचे लिफाफा 'अ' (निविदा व इसारा रक्कम) व 'ब' (तांत्रिक प्रस्ताव) हे दिनांक ०७ जुन, २०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता उपस्थित ई-निविदाकारांच्या प्रतिनिधीं समक्ष उघडण्यात आले. या प्रकल्पासाठी खालील निविदाकारांनी ई-निविदा सादर केल्या :-

| **अ.क्र.** | **कंत्राटदारांचे नाव** | **ई-निविदा सादर करण्यात आल्या** |
|---|---|---|
| | | **पॅकेज- सी.ए.५४** |
| १ | मे. टाटा प्रोजेक्ट्स लिमीटेड | ✓ |
| २ | मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | ✓ |
| ३ | मे. एनसीसी लिमीटेड | ✓ |
| | **एकूण** | **०३** |

ई-निविदांच्या पात्रतेची व तांत्रिक प्रस्तावाची छाननी मेट्रो मार्ग-४अ पॅकेज क्र.सी.ए.५४ प्रकल्पाच्या साधारण सल्लागार (General Consultant) मार्फत करण्यात आली व त्या संदर्भातील अहवाल त्यांनी प्राधिकरणास दिनांक १७ जुलै, २०१९ रोजी सादर केला. सदर अहवालानुसार निविदाकारांच्या पात्र/अपात्रतेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

**निविदांची आर्थिक छाननी**

| अ.क्र | कंत्राटदारांचे नाव | पॅकेज सी.ए.५४ |
|---|---|---|
| १ | मे. टाटा प्रोजेक्ट्स लिमीटेड | पात्र |
| २ | मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | पात्र |
| ३ | मे. एनसीसी लिमीटेड | पात्र |
| | **एकूण** | **पात्र-३** |

पॅकेज क्र. सी.ए.५४ अंतर्गत तांत्रिकदृष्ट्या पात्र तीन्ही निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा ‘क’ –आर्थिक प्रस्ताव) दिनांक २३ जुलै, २०१९ रोजी ई-निविदाकारांच्या उपस्थित प्रतिनिधीं समक्ष उघडण्यात आले. उघडलेल्या सर्व ई-निविदा लिफाफा ‘क’ आर्थिक प्रस्तावांची छाननी मेट्रो मार्ग-४ अ प्रकल्पाचे साधारण सल्लागार M/s. DB Engineering & Consulting GmbH, Hill International Inc. and Louis Berger Consulting Pvt.Ltd. यांच्या मार्फत करण्यात आली व त्यासंदर्भातील अहवाल त्यांनी प्राधिकरणास दि.२५-०७-२०१९ रोजी सादर केला. या अहवालानुसार निविदाकारांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे:-

**पॅकेज क्र. सी.ए.५४**

| अ.क्र | कंत्राटदारांचे नाव | निविदेची रक्कम (रु. कोटी) | प्राप्त देकार (रु. कोटी) | % कमी /अधिक (-)/(+) |
|---|---|---|---|---|
| १ | मे. टाटा प्रोजेक्ट्स लिमीटेड | **३०८.२२** | ३७३.०० | (+)२१.०१% |
| २ | **मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि.** | | **३६८.७९** | **(+)१९.६५ %** |
| ३ | मे. एनसीसी लिमीटेड | | ३७७.५६ | (+)२२.५०% |

३.३ महानगर आयुक्त यांनी असे नमुद केले की, पॅकेज क्र.- सी.ए.५४ मध्ये **मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि.** यांचा रु. ३६८.७९ कोटी रक्कमेचा लघुत्तम देकार अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा रु. ३०८.२२ कोटीच्या तुलनेत १९.६५% जास्त दराचा आहे. सदर कंत्राटदार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारे व रास्त असून साधारण सल्लागार

M/s. DB Engineering & Consulting GmbH, Hill International Inc. and Louis Berger Consulting Pvt. Ltd. यांनी सादर केलेल्या अहवालानुसार लघुत्तम निविदांकारांचा देकार पुढीलप्रमाणे आहे :-

| पॅकेज क्र. | कंत्राटदाराचे नाव | निविदेची रक्कम (रु. कोटी) | प्राप्त लघुत्तम देकार (रु. कोटी) | %कमी/अधिक (-)/(+) |
|---|---|---|---|---|
| सी.ए.-५४ | **मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि.** | ३०८.२२ | **३६८.७९** | (+)१९.६५% |

मेट्रो प्रकल्पाकरिता प्राप्त झालेल्या निविदांचे तांत्रिक व आर्थिक प्रस्तावांची प्राधिकरण स्तरावर पृथ:करण करून निविदा स्विकृती संदर्भात शिफारस करण्याकरीता प्राधिकरणांतर्गत अतिरिक्त महानगर आयुक्त-१ तथा प्रकल्प संचालक यांच्या अध्यक्षतेखाली निविदा शिफारस समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये (१) संचालक (कार्य) -मेट्रो (२) वित्तीय सल्लागार (३) संचालक (प्रणाली) (४) मुख्य अभियंता, नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचा समावेश आहे. मेट्रो मार्ग-४ अ प्रकल्पाचे साधारण सल्लागार मे. DB Engineering & Consulting GmbH, Hill International Inc. and Louis Berger Consulting Pvt. Ltd. यांनी सादर केलेला तांत्रिक व आर्थिक छाननी अहवाल तसेच मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांनी त्यांच्या दि ०१-०८-२०१९ व ०९-०८-२०१९ मध्ये जादा दरांच्या अनुषंगाने सादर केलेला खुलासा व त्यावर साधारण सल्लागार यांनी कळविलेले शेरे सदर निविदा शिफारस समितीपुढे दि.०४-०९-२०१९ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत सादर करण्यात आले.

३.४ मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांचा देकार हा अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा १९.६५% जादा दराचा असल्यामुळे त्यांना वाटाघाटी साठी दिनांक ०४-०९-२०१९ रोजी आयोजित निविदा शिफारस समितीच्या बैठकीत बोलाविण्यात आले होते. वाटाघाटी दरम्यान सर्व तांत्रिक बाबींची सर्वंकष चर्चा करण्यात आली. चर्चे दरम्यान मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांनी सांगितले की, त्यांनी बांधकाम दरम्यान समोर येणा-या विविध अडचणींचा विचार करून सर्वात कमी किंमतीची बोली निविदेत सादर केली असून त्यास मान्यता देण्याची विनंती केली. मात्र कंत्राटदाराने सांगितलेल्या विविध अडचणींपैकी स्थानकांमधील spine and wing पद्धतीच्या बांधकामामुळे, तसेच मुंबई महानगर प्रदेशांतर्गत सुरू असलेल्या विविध बांधकामांमुळे मशिनरी, कामगार व

कर्मचारी उपलब्ध होण्याकरिता जादा खर्च करावा लागत असल्याची बाब तसेच त्यामुळे कंत्राटदाराच्या ओव्हरहेड चार्जेसमध्ये होणारी वाढ या अडचणी व MoHUA च्या दि. १९/०२/२०१९ रोजी सादर केलेल्या अहवालातील तरतुदीनुसार निविदा स्विकृती दिनांकापर्यंत अनुज्ञेय असलेली ५% प्रती वर्ष प्रमाणे परीगणित होणारी भाव वाढ विचारात घेता निविदाकारानी सादर केलेले स्पष्टीकरण काही प्रमाणात मान्य करण्यास हरकत नसावी व त्यानुसार निविदाकाराकडून सुधारीत प्रस्ताव प्राप्त करून त्यास कार्यकारी समितीच्या समोर मान्यतेसाठी सादर करण्यात यावे असे ठरले. त्यानुसार निविदाकार मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांनी त्यांच्या दि ०४-०९-२०१९ च्या पत्रान्वये रु ३४२.१३५ कोटी रक्कमेचा सुधारीत देकार सादर केला आहे. सर्व वस्तुस्थितीचा व वर नमुद अडचणींचा विचार करून अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा १९.६५ % जादा दराऐवजी निविदाकाराने सादर केलेला रू ३४२.१३५ कोटी रक्कमेचा म्हणजेच अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा ११ % जादा दराचा सुधारीत देकार वाजवी असल्याचा व त्यास कार्यकारी समितीच्या स्विकृतीसाठी सादर करणे योग्य असल्याचा निर्वाळा निविदा शिफारस समितीने दिला.

निर्णय :- **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३८५ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा व याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे पॅकेज-सी.ए.५४ साठी **मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि.** यांच्या रू. **३४२.१३५ कोटी** देकाराची, वस्तू व सेवा कराच्या किंवा इतर करांच्या दरामध्ये निविदा प्राप्त होण्याच्या दिनांकापासून आतापर्यंत झालेले बदल व कंत्राटीय कालावधीत आणखी बदल झाल्यास कंत्राटीय तरतूदीनुसार कंत्राटीय किंमतीमध्ये वेळोवेळी योग्य ते समायोजन करण्याच्या अधिन राहून, स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य अर्थिक बदलासह अधिदान करण्यास देखील मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** कार्यकारी समितीच्या बैठकीच्या इतिवृत्ताच्या मंजूरीची प्रतिक्षा न करता **मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि.** यांना त्यांच्या सुधारित न्युनत्तम बोली रू. **३४२.१३५ कोटीच्या** अनुषंगाने स्वीकृती पत्र देण्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.

"**पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त प्राधिकरण यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ४: विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत कुळगांव-बदलापूर नगर परिषद हद्दीतील जुना कात्रप पेट्रोल पंप ते खर्वई-ज्यूवेली बाह्य वळण रस्त्याचे ३० मीटर डी.पी. प्रमाणे रस्त्यालगतच्या गटारासहीत कॉंक्रिटीकरण करणे या कामाच्या प्रथम लघुत्तम निविदेस मान्यता मिळणेबाबत.**

४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना प्रमुख, अभियांत्रिकी यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातंर्गत बदलापूर नगरपरिषद हद्दीतील कुळगाव-बदलापूर नगर परिषद हद्दीतील जूना कात्रप पेट्रोल पंप ते खर्वई-ज्यूवेली बाहय वळणरस्त्याचे ३० मीटर डी. पी. प्रमाणे रस्त्यालगतच्या गटारासहीत कॉंक्रिटीकरण करणे, तसेच रुंदीकरणासह गटाराचे बांधकाम करणे, या कामास सुमारे रु. १०५.० कोटी इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी दिनांक २२ मे, २०१९ रोजीच्या टिप्पणी अन्वये मान्यता दिली आहे.

४.२ त्यानंतर प्रमुख, अभियांत्रिकी यांनी असेही सांगितले की, सदर कामासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. मोनार्च सर्व्हेअर्स अँड इंजिनिअरींग कन्सल्टंट प्रा. लि. यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सल्लागाराने तांत्रिक अभ्यास करुन सदर रस्त्याच्या एकूण ६.८ कि.मी. लांबी पैकी उपलब्ध ३.६४ कि.मी. लांबी मधील रस्त्याचे अंदाजपत्रक ३० मीटर डी. पी. प्रमाणे ६ पदरी कॉंक्रिटीकरण करुन रस्त्याचे रुंदीकरण करणे प्रस्तावित केले आहे. रस्त्याच्या दुतर्फा २.५ मीटर रुंदीच्या साईट पट्टयासह, पर्जन्य जलवाहिन्याचे बांधकाम करणे. तसेच पथ दिवे बसविणे, मो-यांचे रुंदीकरण करणे व नवीन मो-या बांधणे, सेवा वाहिन्या स्थलांतरीत करणे इत्यादी बाबी देखील समाविष्ट केल्या आहेत. उर्वरीत रस्त्याच्या लांबीचे बदलापूर नगरपरिषद यांच्या मार्फत

भूसंपादनाचे काम सल्लागाराच्या मदतीने करण्यात येत आहे. तसेच भूसंपादनाचे काम पूर्ण झाल्यानंतर उवरीत ३.१६ कि.मी. लांबी मधील रस्त्याचे अंदाजपत्रक तयार करुन प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर काम हाती घेण्यात येईल.

४.३ प्रमुख, अभियांत्रिकी यांनी असेही नमूद केले की, विषयांकीत कामासाठी ८ निविदाकारांनी अंतिम मुदतीपर्यंत निविदा शुल्क व इसारा रक्कम अदा करुन ई-निविदा सादर केल्या. तसेच वरील ८ निविदाकारानी निविदेतील अटी व शर्ती इ. बाबतची पूर्तता केली व तांत्रिक दृष्टया पात्र ठरल्या. ८ पात्र कंत्राटदाराच्या निविदा दि.६ ऑगस्ट २०१९ रोजी उघडण्यात आल्या. त्यांचा देकाराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र | कंत्राटदाराचे नाव | वस्तु व सेवाकरा सहीत निविदा रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मे. एन जी प्रोजेक्टस लि. | ८९,१६,२४,७६८/- | -३.६७% (कमी) आठवा लघुत्तम |
| २. | मे. श्री. स्वामी समर्थ इंजिनिअर्स | ७७,१८,१५,८७१/- | -१६.६१४% (कमी) तृतीय लघुत्तम |
| ३. | मे. नविन मेरिको इंजिनियरींग कं. प्रा. लि. | ८०,५३,५९,४००/- | -१२.९९% (कमी) पाचवा लघुत्तम |
| **४.** | **मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा. लि.** | **७४,९६,३८,६३७/-** | **-१९.०१%** (कमी) **प्रथम लघुत्तम** |
| ५. | मे. लॅन्डमार्क कोरपोरेशन प्रा. लि. | ८०,०५,३७,०५५/- | -१३.५११% (कमी) चतुर्थ लघुत्तम |
| ६. | मे. आर. पी. एस इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा. लि. | ८०,९८,०२,२५२/- | -१२.५१% (कमी) सहावा लघुत्तम |
| ७. | मे.वितराग इन्फ्रा प्रोजेक्टस लि. | ७६,७७,८०,२८१/- | -१७.०५% (कमी) व्दितीय लघुत्तम |
| ८. | मे.रेलकॉन इन्फ्रा प्रोजेक्टस लि. | ८५,८१,१८,२६२/- | -७.२९% (कमी) सातवा लघुत्तम |

४.४ चर्चेदरम्यान, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली की, प्रथम लघुत्तम निविदाकार मे. एन.ए. कन्सट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-१९.०१%) कमी दराची भरल्याबाबतची कारणमिमांसा करावी. यावर प्रमुख अभियांत्रिकी यांनी असे सांगितले की, सदर कंत्राटदारांची इतर रस्त्याची / बोगदयाची कामे जवळच्या क्षेत्रात सुरु आहेत, तसेच सदयस्थितीत कंत्राटदाराचे स्वत:चे मालकीचे आरएमसी प्लँट, यंत्रसामुग्री, कर्मचारी, मनुष्यबळ तसेच सर्व प्रकारचे संसाधने स्थापित असल्यामुळे कंत्राटदाराची संभाव्यत: १८-१९ % बचत होणे अपेक्षित असल्यामुळे सदर कंत्राटदारास कमी दरामध्ये काम करणे शक्य आहे.

तसेच चर्चेदरम्यान प्रमुख अभियांत्रिकी यांनी सदर रस्त्याच्या कामाचा काटछेद नकाशा मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांना दाखविला यावर मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशा सूचना दिल्या की, सदर काम प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर करतेवेळेस कनिष्ठ अभियंता/ उप अभियंता तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या मार्फत रस्त्याच्या विविध थरांच्या जाडीचे मोजमाप लेव्हल प्रमाणे वारंवार तपासून कामाची गुणवत्ता विशेषत: ज्या भागामध्ये २.२५ मी. खोदाई (डांबरी पृष्ठभागाखाली) होणार आहे अशा ठिकाणी कंत्राटात नमूद केलेल्या MoRTH च्या मानांकनाप्रमाणे राहील याबाबत खात्री करावी.

**निर्णय: चर्चेनंतर, बाब टिपणीतीत प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-**

**ठराव क्र. १३८६ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उप कलम (३) चे पोटकलम (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत व त्यास सहाय्यभुत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत बदलापुर नगरपरिषद हद्दितील कुळगांव-बदलापुर नगरपरिषद हद्दीतील जुना कात्रप पेट्रोल पंप ते खर्वई-ज्यूवेली बाहय वळण रस्त्याचे ३० मी. डी. पी. प्रमाणे रस्त्यालगतच्या गटारासहीत काँक्रिटीकरण करणेचे कामा करीता एन. ए. कन्सस्ट्रक्शन प्रा.लि.यांनी सादर केलेला प्रथम लघुत्तम निविदा रक्कम रु.७४,९६,३८,६३७.२९/- (रुपये चौऱ्याहत्तर कोटी शहाण्णव लाख अडतीस हजार सहाशे सदतीस व पैसे एकोणतीस मात्र) (१९.०१% कमी दर) स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कामाची निकड लक्षात घेता बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीची प्रतिक्षा न करता कंत्राटदारास काम तात्काळ सुरु करण्यास सुध्दा मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*********